


दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
# लोकआरंभ
LOK AARAMBH
dainiklokaarambh@gmail.com
कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर

प्रतिनिधी नेमणे आहे.
बीड आंबेजोगाई गेवराई वडवणी केज परळी पाटोदा शिरूर कासार धारूर आष्टी माजलगाव इच्छुकाने संपर्क साधावा
94036 41482

बीड/महाराष्ट्र वर्ष २ रे | मंगळवार ३ सप्टेंबर २०२४ | अंक२६८ ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु

# आघाडी आणि महायुतीच्या नाराजांना उमेदवारी देणार का? ; मनोज जरांगे यांनी काय सांगितलं?

## मला मुख्यमंत्री व्हायचं नाही

मला मुख्यमंत्री व्हायचं नाही. माझी ती इच्छा नाहीच. तसं असतं तर जाहीर केलं असतं. इतरांना म्हटलं असतं तुम्ही आमदार व्हा. मला माझा स्वार्थ पाहायचा नाही, समाजासाठी लढायचं आहे. सरकारला आमची विधानसभेची भूमिका पहायची होती, पण त्यांनी निवडणुका पुढं ढकलल्या. मग आम्हीपण आमचा निर्णय पुढं ढकलला आहे, असं मनोज जरांगे म्हणाले.

## मराठ्यांची फडणवीस यांच्यावर नाराजी

विधानसभेला कोण टार्गेट असेल हे आताच सांगणार नाही. लोकसभेला समाजाने ताकद दाखवून दिली आहे, विधानसभेतही दाखवू. राज्यभर दौरे सुरू आहेत. या दरम्यान समाजासोबत विधानसभेबाबत चर्चा करत नाही. मुळात आमच्याकडे उमेदवारचं उमेदवार आहेत. निवडणूक लढण्याची इच्छा असणारे राजकीय नेते मला भेटायला येतात. मीडिया निघून गेल्यावर ते माझ्याकडे येतात. आम्ही 10वर्षे कामं करतोय अन् तीन पक्ष एकत्र आलेत. मग आमचं काय होणार? आम्हाला हे घराणं नको, असं हे नेते सांगत आहेत. एक म्हणतो, हे घराणं नको तर दुसरा म्हणतो, ते घराणं नको. भाजपमधील मराठ्यांची तर देवेंद्र फडणवीस यांच्यावर खूप नाराजी आहे, असा दावाही त्यांनी केला.



मनोज जरांगे पाटील यांनी विधानसभा निवडणुकीची जय्यत तयारी सुरु केली आहे. जरांगे कुणाला उमेदवारी देणार याकडे सर्वांचं लक्ष लागलेलं आहे. उमेदवारी मिळावी म्हणून अनेकजण मनोज जरांगे यांना भेटतही आहेत. इच्छुकांचे सुमारे हजार तरी अर्ज जरांगे यांच्याकडे आले आहेत. जरांगे महाविकास आघाडी आणि महायुतीतील इच्छुकही उमेदवारीसाठी येत आहेत. दोन्ही आघाड्यातील या नाराजांना जरांगे पाटील तिकीट देणार का? याकडे सर्वांचं लक्ष लागलेलं असतानाच जरांगे पाटील यांची मोठी प्रतिक्रिया आली आहे.मनोज जरांगे पाटील यांनी मीडियाशी संवाद साधताना ही माहिती दिली. महायुती आणि मविआमधील नाराजांना आम्ही आमच्या सोबत घेणार नाही. त्यांना सोबत घेऊन आमच्यातल्या इच्छुकांचं आम्ही काय करू? असा सवाल करतानाच विधानसभा लढायचं ठरलं तर उमेदवारांची नावं समाजासमोर ठेवणार आहे. मग समाजाने ठरवावं. आमची एकजूट असल्यानं कोणी कोणाचे पाय खेचनार नाही, असं मनोज जरांगे म्हणाले.

## मी राजकीय बोलणारच

देवेंद्र फडणवीस आमचे विरोधक नाहीत अन् शत्रूही मानलेले नाही. फक्त मराठ्यांचा द्वेष करण्याची वागणूक त्यांची चांगली नाही. ते मराठेच मराठ्यांच्या अंगावर सोडतात. फडणवीस हे कोणत्याच मंत्र्याला अन् आमदारांना काम करू देत नाहीत. अगदी आरक्षणाबाबतही बोलू देत नाहीत. फडणवीस साहेब मी आज सांगतो, मला राजकारणात जायचं नाही. आमच्या समाजालाही राजकारणात जायचं नाही. पण आरक्षण दिलं नाही तर मी राजकीय बोलणार म्हणजे बोलणारच, असा इशारा त्यांनी दिला.



# घोंगडी बैठकी ला लाखोंच्या संख्येने उपस्थित रहा - सकल मराठा समाज माजलगाव

**माजलगाव प्रतिनिधी:-**

संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्रभर घोंगडी बैठकीचा आयोजन, या निमित्त 6 सप्टेंबर 2024 रोजी माजलगाव मतदार संघ तेलगाव जिजाऊ मंगल कार्यालय या ठिकाणी सकाळी साडेअकरा वाजता या घोंगडी बैठकीचा आयोजन केलेआहे. या घोंगडी बैठकीच्या आयोजनानिमित्त सकल मराठा समाजाचे सामाजिक काम करणारे कार्यकर्ते माजलगाव तालुक्यात प्रत्येक गावगाड्यात फिरवून सव्वा लाख ते दीड लाख मराठा बांधवांनी आणि शेतकरी बांधवांनी जरांगे पाटील यांच्या घोंगडी बैठकीला उपस्थित राहण्याचे आवाहन करीत आहेत. तसेच जरांगे पाटील यांनी मराठा आरक्षण तसेच शेतकरी कर्जमाफी हे महत्त्वाचे मुद्दे घेतले असल्याकारणाने महाराष्ट्रातला शेतकरी जरांगे पाटील यांच्या पाठीशी भक्कमपणे उभा राहील असे दिसून येत आहे येणाऱ्या विधानसभा या विधानसभेमध्ये सर्वसामान्य शेतकऱ्यांची पोरं या विधानसभावनामध्ये पाठवायची की नाही निवडणूक लढवायची की नाही हा निर्णय या घोंगडी बैठकीच्या माध्यमातून होणार असून, अनेक मराठा बांधवांना कुणबी प्रमाणपत्र मिळाले अजूनही बरेचसे मराठा बांधव कुणबी प्रमाणपत्रापासून वंचित आहेत . जोपर्यंत शेवटच्या मराठा बांधवांच्या घरात कुणबी प्रमाणपत्र जाणार नाही तोपर्यंत हा लढा सुरूच राहील असे जरांगे पाटील म्हणतात. माजलगाव मतदार संघाची 6 सप्टेंबर रोजी ची घोंगडी बैठक ना भूतो ना भविष्य अशी घोंगडी बैठक होणार असून लाखोंच्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन सकल मराठा समाज माजलगाव यांच्या वतीने करण्यात येत आहे

# बीड जिल्ह्यात जोरदार पाऊस, नागरिकांनी सतर्कता बाळगावी खा. बजरंग सोनवणे यांचे जनतेला आवाहन

**बीड/प्रतिनिधी** बीड शहरातील बिंदुसरा नदीच्या काठावरील पूर रेषेच्या आत आणि आसपास राहणाऱ्या रहिवाशांनी विशेष सावधानता बाळगावी. पावसाच्या तीव्रतेमुळे नदीच्या पाण्याची पातळी अचानक वाढू शकते, ज्यामुळे पूराचा धोका संभवतो. आपली आणि आपल्या कुटुंबाची सुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी, आवश्यक असल्यास त्वरित सुरक्षित स्थळी स्थलांतर करावे. प्रशासनाच्या सूचना सतत ऐकत राहा आणि परिस्थितीचा आढावा घेत राहा. असे आवाहन खा. बजरंग सोनवणे यांनी केले आहे. बीड जिल्ह्यात गेल्या दोन दिवसांपासून पावसाचा जोर वाढला आहे.त्यामुळे नदी,नाले, ओढे, गोदावरी पात्र, लघु,मध्यम प्रकल्प



भागात राहणाऱ्या नागरिकांनी सतर्कता बाळगावी, बीड जिल्ह्यात रेड अलर्ट जारी असल्याने, जनजीवन विस्कळीत झालं आहे. त्यामुळे प्रशासनाशी संपर्क ठेवणे अत्यंत आवश्यक आहे, जेणेकरून कोणत्याही आपत्कालीन स्थितीत त्वरित मदत मिळू शकेल. तसेच परळी-बीड हायवेवरील पांगरी (वाण नदी) येथील पर्यायी पूल पावसामुळे पाण्याखाली गेला आहे. परिस्थिती गंभीर असून, पूल कधीही वाहून जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे, परळीवरून बीड आणि बीडवरून परळीला जाणाऱ्या वाहनधारकांनी पर्यायी मार्गाचा वापर करावा. आपल्या सहकार्याने दुर्घटना टाळता येऊ शकते.शेतकरी बांधवांनी आपल्या पशुधनाची विशेष काळजी घ्यावी, कारण हवामानाची अस्थिरता पशुधनासाठी हानिकारक ठरू शकते. तसेच, अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानामुळे खरीप पिकांची हानी झाली असल्यास, संबंधित शेतकऱ्यांनी तात्काळ आपल्या पिकांच्या नुकसानीची माहिती विमा कंपनीला कळवावी. योग्य वेळी सूचना दिल्यास नुकसान भरपाई मिळण्यास मदत होईल. आपल्या हक्कांच्या संरक्षणासाठी हे पाऊल महत्त्वाचे आहे.असे आवाहन खा.बजरंग सोनवणे यांनी केलं आहे.

## बिंदुसरा नदीपात्रातील व नदीकाठावरील नागरिकांनी सतर्कता



बाळगावी जिल्हा प्रशासनातर्फे आवाहन

बीड, दि.1: बिंदुसरा धरण व खटकाळी धरण पूर्ण क्षमतेने भरले आहे. धरण सांडव्या वरुन मोठ्या प्रमाणात विसर्ग सुरू असून प्रकल्पातून नदीपात्रात जवळपास 400 क्यूसेक्स पाणी नदी पात्रात येत आहे. आज रविवारी (1 सप्टेंबर) रात्रीला मोठा पाऊस झाल्यास बिंदुसरा नदीपात्रात पाणी वाढ होऊ शकते. त्यामुळे नदीपात्रातील व नदीकाठावरील सर्व नागरिकांनी सतर्कता बाळगावी, असे आवाहन जिल्हा प्रशासनातर्फे करण्यात येत आहे.

# मराठा सेवा संघाचा वर्धापनदिन विविध उपक्रमांनी साजरा!

**बीड । प्रतिनिधी**

युगप्रवर्तक आदरणीय पुरुषोत्तम खेडेकर साहेबांनी 1 सप्टेंबर 1990 साली स्थापन केलेल्या मराठा सेवा संघ या सामाजिक संघटनेला आज 34 वर्ष पूर्ण झाली आहेत. अंधश्रद्धेच्या गर्तेत सापडलेल्या बहुजन समाजाची एकत्रित मोट बांधून परिवर्तनवादी विचार रुजविण्याचे कार्य ही संघटना प्रामाणिकपणे करत आहे.मराठा सेवा संघ हे फक्त सामाजिक संघटन नसून परिवर्तन वादी विचारांचे अधिष्ठान आहे!

मराठा सेवा संघाच्या 34 व्या वर्धापनदिनाच्या निमित्ताने मराठा सेवा संघ बीडच्या वतीने विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. 1 सप्टेंबर च्या सकाळी पाऊस सुरू असताना सह्याद्री देवराई येथे मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण करण्यात आले.तर दुपारी बारा वाजता गौतम ऋषी संस्थान घोलपदरा बीड येथे कुटुंब स्नेह मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी गौतम ऋषी संस्थान चे मठाधिपती ह.भ. प.श्रीरंग महाराज डोंगरे यांनी उपस्थित असणाऱ्या सर्वांना मार्गदर्शन करताना सांगितले की



जगातील आदर्श मातृत्व असणाऱ्या जिजाऊंचा आदर्श सर्वांनी घेऊन आपल्या मुलांना घडवले पाहिजे. या कार्यक्रमाला मराठा सेवा संघाचे सर्व पदाधिकारी आपल्या परीवारा सह उपस्थित होते.यावेळी विभागीय अध्यक्ष शिवश्री अशोकजी ठाकरे, जिल्हाध्यक्ष धनंजय शेंडगे, प्रवक्ते बापूसाहेब शिंदे यांनी मार्गदर्शन केले. जिल्हासचिव प्रा.पंजाबराव येडे यांनी सूत्रसंचालन केले तर आभार प्रदर्शन शिवश्री संतोष डोंगरे यांनी केले.

या सर्व कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी मराठा सेवा संघाचे विभागीय अध्यक्ष अशोकजी ठाकरे, जिल्हाध्यक्ष धनंजय शेंडगे जिल्हा सचिव प्रा. पंजाबराव येडे,जिल्हा कार्याध्यक्ष जनार्दन शिंदे,जिल्हा उपाध्यक्ष,बबन तांबे संतोष माने, जिल्हा प्रवक्ता बापूसाहेब शिंदे,कोषाध्यक्ष विकास होके पाटील,संत गाडगेबाबा समाजप्रबोधन कक्षाचे जिल्हाध्यक्ष संतोष डोंगरे,जिल्हासचिव श्रीकृष्ण उबाळे,तालुकाध्यक्ष नितीन मातकर,शिवाजीराव नवले,किरण सावंत,अनिल कोल्गडे,विशाल घोरड,सचिन काळे,संभाजी शिंदे यांनी परिश्रम घेतले!

# पावसाचा जोर कमी होताच शेती पिकांचे पंचनामे करण्याचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांचे निर्देश

## शेती पिकांच्या नुकसानीची माहिती शेतकऱ्यांनी विमा कंपनीस विहित मर्यादेत कळवावी - मुंडेंचे आवाहन

## बीड जिल्ह्यातील नदी काठच्या गावांनी सतर्क राहावे, नागरिकांनी धोक्याच्या ठिकाणी जाणे टाळावे, रात्रीतून काही नद्या धोक्याची पातळी ओलांडण्याची शक्यता - धनंजय मुंडे यांचे जनतेला आवाहन

मुंबई (दि. 01) - संपूर्ण बीड जिल्ह्यात 31 ऑगस्ट च्या सायंकाळपासून ते आतापर्यंत सातत्याने सर्व दूर पाऊस पडत असून जिल्ह्यातील जवळपास सर्वच जलाशय कुटुंब भरून नदीला आले खळखळून वाहू लागले आहेत. जिल्ह्यावरील जलसंकट दूर झाल्याची बातमी जरी आनंददायक असली तरी सततच्या पावसाने अतिवृष्टीचा धोका निर्माण झाला असून त्यामुळे खरीप हंगामातील शेती पिके धोक्यात येण्याची शक्यता आहे. तर काही महसूल मंडळांमध्ये 24 तासांमध्ये अतिवृष्टीच्या निकषांप्रमाणे किंवा त्यापेक्षा अधिक पाऊस पडला असून, राज्य शासनाच्या महसूल विभागाने यापूर्वीच काढलेल्या आदेशाला अनुसरून महसूल व कृषी विभागाने पावसाचा जोर कमी होताच शेती पिकांच्या तसेच घरांच्या पडझडीच्या आदी नुकसानीचे तातडीने वस्तुनिष्ठ पंचनामे करावेत व शेती पिकांच्या 33% च्या मर्यादेपेक्षा जास्त नुकसानीचे अहवाल राज्य शासनाकडे मदतीच्या मागणीसह तातडीने पाठवावेत असे निर्देश जिल्ह्याचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी जिल्हा प्रशासनाला दिले आहेत. बीड जिल्ह्यातील बहुतांश शेतकऱ्यांनी खरीप हंगामात एक रुपयात पिक विमा योजनेत सहभाग घेतला असून आपल्या शेती पिकांच्या झालेल्या नुकसानीची माहिती विमा कंपनीच्या नियमानुसार विमा कंपनीला देखील निर्धारित वेळेत कळवावी, जेणेकरून बाधित शेतकऱ्यांना पीक विम्याचे ही संरक्षण लागू राहील असेही आवाहन पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी केले आहे.

दरम्यान सध्या जिल्ह्यात सर्वदूर सुरू असलेल्या पावसामुळे जिल्ह्यातील जवळपास सर्वच लहान मोठे जलाशय पूर्ण क्षमतेने भरले असून त्याउपर नद्यांमधून व नाल्यांमधून पाणी वाहत आहे. पावसाचा जोर आणखी पुढील 24 तास जर इतकाच प्रखर राहिला तर काही नद्या धोक्याची पातळी ओलांडू शकतात व त्यामुळे नदीकाठच्या गावांना किंवा नदीकाठच्या शहर वस्त्यांना देखील याचा धोका निर्माण होऊ शकतो. त्यामुळे विशेष करून जलाशय व नदीकाठच्या गावच्या नागरिकांनी सतर्क रहावे या आवाहनासह नदीच्या पूर नियंत्रण रेषेच्या क्षेत्रात राहणाऱ्या नागरिकांचे इतरत्र स्थलांतर करण्यात यावे अशा पद्धतीच्या सूचना देखील धनंजय मुंडे यांनी जिल्हा प्रशासनाला केल्या आहेत.

# पत्रकारांसाठी जाहीर केलेले महामंडळ तातडीने कार्यान्वित करा

## व्हॉईस ऑफ मीडियाच्या शिर्डी राज्य अधिवेशनात विविध ठराव मंजूर ठराव

गंगापूर प्रतिनिधी
सुनील झिंजुर्डे पाटील

पत्रकारांसाठी शासनाने जाहीर केलेले महामंडळ तातडीने कार्यान्वित करा, दहा वर्ष पुर्ण झालेल्या पत्रकारांना सरसकट अधिस्वीकृती कार्ड व पत्रकार म्हणून प्रमाणपत्र द्यावे यासह विविध मागण्यांचे ठराव व्हॉईस ऑफ मीडिया पत्रकार संघटनेच्या शिर्डी येथील राज्यस्तरीय अधिवेशनात मांडण्यात आले. हे सर्व ठराव एकमताने मंजूर करण्यात आले. देशातील क्रमांक एक ची आंतरराष्ट्रीय पत्रकार संघटनेचे दुसरे राज्यस्तरीय अधिवेशन शिर्डी दि. 31 ऑगस्ट व 1 सप्टेंबर रोजी येथे पार पडले. अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवशी संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष संदीप काळे यांच्या अध्यक्षतेखाली संघटनेची विशेष सभा झाली. यावेळी राज्य अध्यक्ष अनिल मस्के, कार्याध्यक्ष योगेंद्र दोरकर आदी उपस्थित होते.

पत्रकारांच्या विविध मागण्यांसाठी व्हॉईस ऑफ मीडिया च्या




माध्यमातून शासन दरबारी सतत पाठपुरावा सुरू आहे. यासाठी संघटनेने अनेक आंदोलनांच्या माध्यमातून आवाज उठवला आहे. व्हॉईस ऑफ मीडिया च्या आंदोलनाची दखल घेत शासनाने पत्रकारांसाठी स्वतंत्र कल्याणकारी महामंडळ स्थापन करण्याची घोषणा केली. मात्र अद्याप हे महामंडळ कार्यान्वित केलेले नाही. शासनाने तातडीने हे महामंडळ स्थापन करून ते कार्यान्वित करावे व या महामंडळास 200 कोटी रुपये द्यावे असा ठराव यावेळी करण्यात आला.

यासह दहा वर्ष पत्रकारिता करणाऱ्यां पत्रकारांना सरसकट अधिस्वीकृती कार्ड व पत्रकार म्हणून प्रमाणपत्र द्यावे, दहा वर्ष काम करणाऱ्या पत्रकार व त्यांच्या कुटूंबियांना आरोग्य विमा, विना मूल्य उपचार उपलब्ध करून द्यावेत, पत्रकारांच्या पाल्यांना शैक्षिनिक संस्थामध्ये प्रवेश घेण्यासाठी कोठा ठरवण्यात यावा, प्रत्येक जिल्ह्यात पत्रकार गृहनिर्माण वसाहत निर्माण करावी, पत्रकार संशोधन केंद्र स्थापन करावे, दैनिक व साप्ताहिक यांना देण्यात येणाऱ्या जाहिरातीचे समान धोरण ठरवावे, शासनाने पत्रकार सन्मान योजना राबवावी ज्येष्ठ पत्रकारांना सेवानिवृत्ती वेतन देण्यात यावे आदी मागण्यांचे ठराव एकमताने मंजूर करण्यात आले. सदरचे ठराव शासनाला सादर करण्यात येणार असून अंमलबजावणी साठी संघटनेच्या माध्यमातून पाठपुरावा करण्याचा निर्णय सभेत घेण्यात आला. ठराव वाचन चंद्रपूर जिल्हाध्यक्ष संजय पडोळे यांनी केले.

अधिवेशनातील विविध ठराव..

* पत्रकारांसाठी जाहीर केलेले स्वतंत्र कल्याणकारी मंडळ करावे
* १० वर्ष पूर्ण झालेल्या पत्रकारांना सरसकट अधिस्विकृती कार्ड व पत्रकार म्हणून प्रमाणपत्र देण्यात यावे
* दहा वर्ष पत्रकारिता करणाऱ्या पत्रकार व त्यांच्या कुटुंबाला आरोग्य विमा व विनामूल्य उपचार उपलब्ध करून द्यावेत
* पत्रकारांच्या पाल्यांना शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेश घेण्यासाठी कोटा ठरविण्यात यावा
* प्रत्येक जिल्ह्यात पत्रकार गृहनिर्माण वसाहत निर्माण करावे
* शासनाने प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी पत्रकार संशोधन केंद्राला मान्यता घ्यावी
* शासनाद्वारे दैनिक आणि साप्ताहिकांना देण्यात येणाऱ्या जाहिरातींचे समान धोरण ठरविण्यात यावे
* शासन स्तरावर पत्रकार सन्मान योजना राबविण्यात येऊन जेष्ठ पत्रकारांना सेवानिवृत्ती वेतन देण्यात यावेत.



बीड : राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी शहरानजीक माळावरील शेतात बैलपोळा सणानिमित्त सर्जा-राजाचे पूजन केले. याप्रसंगी डॉ.दीपाताई क्षीरसागर, डॉ.सारिकाताई क्षीरसागर आदींची उपस्थिती होती.

# राशन संदर्भातील विविध समस्येवर संभाजी ब्रिगेड चां तहसील कार्यालय वर हल्ला बोल

माजलगाव (प्रतिनिधी) :- माजलगाव तालुक्यातील प्रत्येक गावात शेकडो नागरिक राशन पासून वंचित आहेत, राशन संदर्भात शेतकरी यादी मधे अनेक शेतकरी असून तहसील कार्यालय येथे अनेक वेळा कागदपत्र देऊन सुद्धा शेतकऱ्यांना अनुदान मिळत नाही. संभाजी ब्रिगेड ने आज 51 शेतकरी लाभार्थी नागरिक यांचे कागदपत्र तहसील कार्यालय येथे जमा केले असून त्यांना तात्काळ अनुदान साठी ऑनलाईन करून देण्यात येईल अशे आश्वासन तहसीलदार साहेब यांनी दिले. अनेक नागरिक आहेत ज्यांना शेती नाही पण शेतकरी लाभार्थी यादी मधे आले आहेत त्यांचे नाव काढून त्या नागरिकांना राशन द्यावे अशी मागणी संभाजी ब्रिगेड चे जिल्हाध्यक्ष यांनी केली. राशन मधे नाव लावणे नाव काढणे या प्रोसेस मधे नागरिकांना रिशिव्हड द्यावी आणि काम मार्गी लावण्यात यावे,तसेच पुरवठा विभाग मधे सी सी टी व्ही कॅमेरा तात्काळ लावला वरील सर्व प्रश्न पंधरा दिवसात मार्गी न काढल्यास संभाजी ब्रिगेड तीव्र आंदोलन करणार

# आठवडी बाजारात पोलिसांचा चोख बंदोबस्त

## राजा- सर्जाचा साज, बैलपोळा खरेदीसाठी शेतकऱ्यांची गर्दी



गंगापूर प्रतिनिधी सुनिल झिंजूर्डे पाटील बळीराजाचा महत्वाचा पोळा सण दोन दिवसांवर येऊन ठेपल्याने आज गंगापूर येथील शनिवारच्या आठवडी बाजारात शेतकऱ्यांनी सर्जा-राजाचा साजश्रृंगार खरेदी करण्यासाठी गर्दी केली होती या वेळी गंगापूर पोलीसांच्या वतीने मोठा चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता, शेतकऱ्यांना वर्षभर शेतात राबवण्यासाठी मदत करणाऱ्या सर्जा राजाचा पोळा सण दोन दिवसांवर येऊन ठेपला आहे. पोळ्याच्या सजावट साहित्याच्या किमतीत मंदा दहा ते पंधरा टक्के वाव झालेली आहे. वर्षभर शेतीत राबणाऱ्या सर्जा-राजाला गोंडे, बागरमाळा, बेगडी, हिंगुळ, मोरखों, झुले, फुगे आदी साजश्रृंगार खरेदी करण्यात आला. आज च्या आठवडी बाजारात शंभरच्या वर दुकाने वाटली होती. तसेच, पोळ्याला मामदेवतेला नारळ फोडण्याची प्रथा आहे. त्यामुळे नारळ विक्रीची दुकाने मोठ्या प्रमाणात होती. सर्जा साठी साहित्य खरेदी करताना शेतकऱ्याच्या चेहऱ्यावर आनंद दिसत होता.शनिवारच्या आठवडी बाजारात चोरीच्या घटना घडू नये म्हणून गंगापूर पोलिसांच्या वतीने चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता यावेळी पोलीस कॉन्स्टेबल अमोल कांबळे, वाहतुक पोलीस संदिप राठोड, जामगाव विट जमादार मनोज घोडके ,राहुल वडमारे आदी कर्मचारी उपस्थित होते.

# अतिवृष्टीमुळे शेतकरी राजा उध्वस्त तात्काळ ओला दुष्काळ जाहीर करून शेतक-यांना आर्थिक मदत द्या

## कृषिमंत्र्यांनी आश्वासनाचा पाऊस पाडायचा थांबून निसर्गाच्या पावसानं उध्वस्त झालेला शेतक-यांना आधार द्यावा तालुकाध्यक्ष देवराव लुगडे महाराज

परळी (वार्ताहर) मागच्या काही दिवसापासून मोठ्या प्रमाणात सतत पाऊस पडत आहे. कधी निसर्गाचा लहरीपणा तर कधी राज्यकर्त्यांच्या शेतीविषयक उदासीन धोरण यामुळे बळीराजा कायमच संकटात सापडलेला आहे. पिकलं तर विकत नाही आणि विकलं तर पिकत नाही असे अवस्था सध्या बळीराजाची झाली आहे. त्यातच सध्या अतिवृष्टीने शेतकऱ्यांच्या हाता तोंडाशी आलेला खरीपांच्या पिकाचा घास अतिवृष्टीमुळे हिरावून जात आहे. यामुळे शेतकरी राजा पूर्णपणे उध्वस्त होत असून तात्काळ ओला



दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना आर्थिक मदत द्यावी अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरद शचंद्र पवार पक्षाचे परळी तालुकाध्यक्ष देवराव लुगडे महाराज यांनी एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे केली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरद चंद्र पवार पक्षाचे परळी तालुकाध्यक्ष देवराव लुगडे महाराज यांनी प्रसिद्ध दिलेल्या पत्रकात म्हटले आहे की, सध्या परळी विधानसभा मतदारसंघाच्या सर्वच मंडळात मोठ्या प्रमाणात पावसाने रुद्ररूप धारण केले आहे. .कापूस सोयाबीन हे पीक जास्त पावसामुळे 80 टक्के उत्पन्न शेतकऱ्यांच्या हातातून गेले आहे. या शेतकऱ्यांना आधार देण्याचं काम करावे तसेच स्थानिक आमदार व बीड जिल्ह्याचे कृषीमंत्री यांनी पिक विमा अतिवृष्टी अनुदान याच फक्त वारंवार शेतकऱ्यांना आश्वासनाच देण्याचं काम केलं आहे हा आश्वासनाचा पाऊस पाडायचा थांबून उध्वस्त झालेल्या शेतकऱ्यांना तात्काळ पंचनाम्याचे नाटक न करता सरसकट आर्थिक मदत करावी अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे तालुकाध्यक्ष देवराव लुगडे महाराज यांनी केली आहे

# आमदार साहेब, नरकयातना संपणार कधी?? स्मशानभूमीचे काम दिडवर्षापासुन रखडल्याने पावसात अंत्यविधी करण्याची नामुष्की :- डॉ.गणेश ढवळे

लिंबागणेश:- बीड तालुक्यातील जिल्हा परिषद सर्कलचे गाव म्हणून ओळखल्या जाणाऱ्या लिंबागणेश येथील स्मशानभूमीचे काम आ.संदिप क्षीरसागर यांच्या कार्यकर्त्यांच्या नाकर्तेपणामुळे रखडलेले असुन पावसात अंत्यसंस्कार करावे लागत असल्याने ग्रामस्थांमध्ये तिव्र नाराजी असुन " सरण रचुन ठिय्या"आंदोलन केल्यानंतर आ.संदिप क्षीरसागर यांनी दिड वर्षांपूर्वी स्मशानभूमीसाठी मंजुर केलेल्या ८ लक्ष रुपयांच्या निधीतून अद्याप काम पूर्ण का नाही?? त्यामुळे आमदार संदीप क्षीरसागर साहेब नरकयातना संपणार कधी?? आणि लिंबागणेश येथील स्मशानभूमीचे काम पूर्ण होणार कधी?? असा प्रश्न सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे यांनी विचारला आहे. लिंबागणेश येथील २० वर्षांपूर्वी बांधण्यात आलेल्या स्मशानभूमीची दुरावस्था असुन पत्रे उडुन गेलेले, बांधकाम ढासळलेल्या अवस्थेत असल्याने नविन स्मशानभूमी बांधकामासाठी निधी देण्यात यावा यासाठी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे यांनी स्मशानभूमीत सरण रचुन ठिय्या आंदोलन केले होते. याची दखल आ.संदिप क्षीरसागर यांनी घेत जिल्हा वार्षिक (दहन/दहनभुमी) जन सुविधा विशेष अनुदान योजनेंतर्गत मुलभूत सुविधांसाठी सन २०२२-२३ आर्थिक वर्षाकरीता ग्रामपंचायत लिंबागणेश येथे स्मशानभूमी बांधकाम व सुशोभीकरणासाठी ८ लक्ष रुपयांचा निधी मंजूर करत दि.३१ मार्च २०२३ रोजी प्रशासकीय मान्यता दिली होती.मात्र आमदार साहेबांच्या कार्यकर्त्यांच्या हलगर्जीपणामुळे स्मशानभूमीचे काम रखडलेले असुन काल सायंकाळी अल्पशा आजाराने मयत झालेल्या कै.केशरबाई



तुळशीराम नाईकवाडे यांचा अंत्यविधी आज दि.१ सप्टेंबर रोजी सकाळी भर पावसात करावा लागला. यावेळी पावसामुळे तारांबळ उडाली असून ग्रामस्थांनी रखडलेल्या स्मशानभूमीच्या कामामुळे पावसात अंत्यसंस्कार करण्याची नामुष्की आल्याने तिव्र नाराजी व्यक्त केली. स्मशानभूमीची दुरावस्था, मृतदेहाची हेळसांड, लोकप्रतिनिधी आणि प्रशासनाला गांभीर्य नाही:- डॉ.गणेश ढवळे

बीड जिल्ह्यातील १३९४ पैकी ६५६ लहान मोठ्या गावात स्मशानभूमीची सोय नसल्याने पावसाळ्यात मृतदेहाची हेळसांड होत आहे.तर आस्तित्वात असलेल्या स्मशानभूमीची दुरावस्था असुन ढासळलेले बांधकाम, उडुन गेलेले पत्रे तर काही ठिकाणी काटेरी झुडुपातुन वाट काढत दहन शेडकडे जावे लागते. काही गावांमध्ये स्मशानभूमीसाठी जागा नसल्याने अंत्यसंस्कार रोखण्यात आल्याच्या घटना घडलेल्या आहेत. त्यातुन वादविवाद निर्माण होतात, सामाजिक स्वास्थ्य बिघडते मात्र याचे लोकप्रतिनिधी आणि प्रशासनाला गांभीर्य दिसून येत नाही.वारंवार निवेदने तसेच आंदोलनानंतर सुद्धा प्रशासनाला जाग येत नाही हि दुर्दैवी बाब आहे.

# आ.आजबेंच्या वाढदिवसानिमित्त विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळतोय!

## अंमळनेर सर्कल प्रमुख मंगेश पवार यांच्या संकल्पनेतून स्पर्धा परीक्षेच आयोजन

## या स्पर्धा परीक्षेत तालुक्यातील ३२ शाळांनी १५१ विद्यार्थ्यांनी नोंदवला सहभाग

कुसळंब | प्रतिनिधी आष्टी मतदार संघाचे लोकप्रिय कर्तव्यदक्ष आमदार बाळासाहेब आजबे काका यांच्या वाढदिवसानिमित्त दरवर्षीप्रमाणे याही वर्षी कुसळंब येथे नवोदयच्या धरतीवर पाचवीच्या विद्यार्थ्यांसाठी तालुकास्तरीय स्पर्धा परीक्षेचा आयोजन केलं जातं. या वर्षी देखील स्पर्धा परीक्षेचा आयोजन केलं होतं यामध्ये पाटोदा तालुक्यातील 32 शाळांनी सहभाग नोंद आला होता तर दीडशेच्या वर विद्यार्थी स्पर्धेसाठी बसले होते या कार्यक्रमासाठी आमदार बाळासाहेब आजबे यांची विशेष उपस्थिती असून कुसळंब मधील सर्वच आजी-माजी जेष्ठ नेते पाटोदा तालुक्यातून पक्षाचे कार्यकर्ते मित्र मंडळ मोठे संख्येने उपस्थित होते. कुसळंब गाव म्हटलं की काहीतरी वेगळेपणा आलाच. त्यातीलच एक भाग म्हणजे आमदार बाळासाहेब आजबे काका यांच्या वाढदिवसानिमित्त दरवर्षी घेण्यात येत असलेला स्पर्धा परीक्षेचा उपक्रम विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देणारा हा कार्यक्रम म्हटलं तर वाव वाटायला नको कारण की या स्पर्धेसाठी पाटोदा तालुक्यातून अनेक शाळा सहभाग नोंदवतात तर शंभर दीडशे च्या वर विद्यार्थी सहभागी होतात.. त्यांना प्रोत्साहन म्हणून बक्षीसांचाही वर्षाव केला जातो मग पाचशे रुपये पासून ते पाच हजारापर्यंतची बक्षीस या स्पर्धा परीक्षेसाठी दिले जातात तर सर्व विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र सन्मानचिन्ह स्मृतिचिन्ह रोख रक्कम देऊन सन्मानित केले जाते. त्याच पद्धतीने यावर्षीही विद्यार्थ्यांना बक्षीस बरोबर सन्मानचिन्ह स्मृतिचिन्ह रोख रक्कम देऊन सन्मानित करण्यात आले या कार्यक्रमासाठी आमदार बाळासाहेब आजबे काका यांची विशेष उपस्थिती होती त्याचबरोबर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे तालुकाध्यक्ष दीपक दादा घुमरे, खंडेश्वर विद्यालयाचे संस्थापक किसनराव पवार बापू, माझी जिल्हा परिषद सदस्य शिवनाथ अण्णा पवार, श्रीहरी काका पवार, महादेव दादा पवार, मेजर शिवाजी पवार, अण्णासाहेब लवांडे, गोवर्धन आप्पा सानप,आबासाहेब पवार, भीमराव सरोदे सर, अतुल अण्णा शेलार, राजेंद्र सकुंडे, अविनाश पवार, अशोक पवार सरपंच, बाबुराव आण्णा धारक, सुभाष पोकळे, नवनाथ पवार, समीर शेख, डॉ. शिवाजी पवार, किरण पवार, परसराम पवार, उमेश पवार, एकनाथ पवार, सतीश पवार, बाबू पवार, विलास पोले, कृष्णा गंडाळ, अमीन शेख, राजेंद्र पोकळे, मुरलीधर तांबे, केदारनाथ येवले, पंकज पवार, नामदेव पवार, काकासाहेब पवार, संजय घोशिर, शिवाजी घोषिर, नाना कवठेकर, कैलास पवार, दत्ता पवार,



राहुल वाळुंजकर, सुशांत पवार, राम पवार, महेश पवार यांच्यासह कार्यकर्ते मित्र मंडळ मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पायके सर व शेलार सर यांनी केले व प्रस्तावना मंगेश पवार तर आभार प्रदर्शन सचिन पवार यांनी व्यक्त केले.

?माझ्या आमदारकीच्या कार्यकाळात समाज हिताचे कामे आमदार झाल्यापासून नक्कीच समाज हिताच्या कामाला मी प्राधान्य दिले असून दूरदृष्टी ठेवून समाजाच्या हिताची कामे कशी केली जातील तो माझा प्रयत्न राहिला आहे मग व्यायामासाठी जिम असतील किंवा सर्वसामान्य गरिबांची छोटे-मोठे कार्यक्रम लग्न समारंभ करण्यासाठी सभामंडप असतील रस्ते असतील ब्लॉक असतील स्मशानभूमी असतील यावर जास्त भर देऊन आमदारकीचा पूर्ण उपयोग समाजहितासाठी करण्याचा पहिल्यापासूनच माझा हेतू राहिला आहे यापुढे देखील समाजाच्या हिताचे काम होतील यात शंका नाही आणि विशेष करून येणाऱ्या काळात शिक्षणावर अधिक भर देण्याचा माझा मानस आहे.

- आमदार बाळासाहेब आजबे काका आ ष्टी विधानसभा मतदारसंघ.

?विद्यार्थ्यांना कलागुणांना वाव मिळण्यासाठी चा उपक्रम वाढदिवसानिमित्त विविध उपक्रम साजरे केल्या जातात त्यातीलच हा एक उपक्रम असून इतर कार्यक्रमापेक्षा वेगळा आहे यामुळे विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळतो आणि त्यांना शिक्षणाची आवड निर्माण होते त्यामुळे प्रथमता आमदार साहेबांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देतो आणि हा कार्यक्रम आयोजित करणारी मंगेश पवार यांचे आभारही या ठिकाणी व्यक्त करतो.

- किसनराव बापू पवार संस्थापक खंडेश्वर माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालय कुसळंब.

?वाढदिवसातून सामाजिक जपणं कर्तव्य! वाढदिवस हे सगळेच करतात केलेही पाहिजेत परंतु त्यातून सामाजिक साध्य करणे खूप महत्त्वाचा आहे त्यामुळेच आमदार बाळासाहेब आजबे काका यांच्या वाढदिवसानिमित्त समाज हित समोर ठेवून आणि विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळावा यासाठी तालुकास्तरीय स्पर्धा परीक्षेचा आम्ही दरवर्षी आयोजन करतो त्यातून नक्कीच विद्यार्थ्यांना आणि पालकांना अधिक प्रोत्साहन मिळते आणि येणाऱ्या नवोदय सारख्या स्पर्धा परीक्षा ला सहजासहजी विद्यार्थी सामोरे जातात त्यामुळे या स्पर्धा परीक्षा अशाच आम्ही यापुढे देखील घेत राहू आणि विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देत राहो ह्याच आमदार काकांना वाढदिवसाच्या खूप खूप शुभेच्छा आहेत...

- मंगेश पवार गटप्रमुख अंमळनेर सर्कल.

### बक्षिसे आणि विजेते!

?प्रथम बक्षीस दीपक दादा घुमरे 5 हजार रुपये. विजेता जिल्हा परिषद शाळा थेरला वेदांत विजय तांबे.
?द्वितीय बक्षीस युवराज झुनगुरे 4 हजार रुपये, विजेता जिल्हा परिषद शाळा पारगाव घुमरा हर्षद हरिदास घुमरे.
?तृतीय बक्षीस जुनेद शेख 3 हजार रुपये, विजेता जिल्हा परिषद शाळा डोमरी प्रणव अर्जुन जगताप.
?चतुर्थ बक्षीस किरण पवार 2 हजार रुपये, विजेता जिल्हा परिषद शाळा जरेवाडी आरोही सोमनाथ डोके.
पाचवी बक्षीस संजय घोषीर 1 हजार रुपये, विजेता जिल्हा परिषद शाळा डोमरी आयुष गजानन माने.
?उत्तेजनार्थ बक्षीस परसराम पवार पाचशे रुपये, विजेता खंडेश्वर विद्यालय कुसळम तन्मय गोरक्षनाथ भराटे.
?उत्तेजनार्थ बक्षीस राजेंद्र सुकुंडे पाचशे रुपये, विजेता माध्यमिक विद्यालय काळोनीवस्ती सावरगाव यशश्री युवराज भवर.


## सततच्या पावसामुळे नागरीकांनी काळजी घ्यावी तर शेतीपिकांचे पंचनामे करण्याचे जिल्हाधिकाऱ्यांच्या आवाहन

बीड,दि.2 -: सततच्या पावसामुळे नागरीकांनी काळजी घ्यावी तर झालेल्या शेती पिकांचे पंचनामे प्रशासनातर्फे तातडीने व्हावे, असे आवाहन जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी प्रसिद्धी पत्रकाव्दारे केले आहे. जिल्ह्यात यावर्षी आतापर्यंत वार्षिक सरासरीच्या ११५.८ टक्के इतका पाऊस झालेला आहे. दि. २ सप्टेंबर २०२४ रोजी सकाळी ८ वा. जिल्ह्यात ९२ मिलीमिटर इतका पाऊस झाला आहे. तसेच एकूण ६२ महसूल मंडळात अतिवृष्टीची नोंद झाली असून त्यापैकी ३५ महसुली मंडळामध्ये १०० मिलीमिटर पेक्षा जास्त पावसाची नोंद झाली आहे. बीड जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात पाऊस पडत आहे. या पावसामुळे जिल्ह्यातील अनेक नदी नाल्यांना पूर आलेले आहेत. कोसळणाऱ्या या पावसामुळे आणि नदी नाल्यांना आलेल्या पुरापासून नागरिकांनी दक्षता बाळगावी. पूर नियंत्रण रेषेत राहणाऱ्या नागरिकांनी तात्काळ सुरक्षित ठिकाणी स्थलांतर करावे, कुठल्याही प्रकारची जीवित वा वित्त हानी होणार नाही याची दक्षता घ्यावी, असे आवाहन जिल्हाधिकारी श्री. पाठक यांनी केले आहे. जायकवाडी प्रकल्पाच्या पाणलोट क्षेत्रात सर्वत्र पाऊस झाला आहे. त्यामुळे यापुढे कोणत्याही क्षणी जायकवाडी (पैठण) धरणातून गोदावरी नदीपात्रात पाण्याचा विसर्ग सुरु करण्यात येईल. जिल्ह्यातील जवळपास सर्वच जलसाठे पूर्ण क्षमतेने भरलेले आहेत. आज बैलपोळा असून बरेच शेतकरी त्यांची जनावरे धुण्यासाठी जालसाठ्यांवर जातात, त्या ठिकाणी काही दुर्देवी घटना घडण्याच्या शक्यता नाकारता येत नाहीत. त्यामुळे सर्व शेतकऱ्यांनी व पशुपालकांनी सतर्क राहून सुरक्षेच्या दृष्टीने दक्ष राहून पोळा साजरा करण्याचे आवाहन ही जिल्हा प्रशासनाने केले आहे. बिंदुसरा धरणात सध्या पाण्याचा प्रवाह मोठ्या प्रमाणात सुरु असल्याने सदर जोखीमेच्या ठिकाणी जाऊन नागरिकांनी फोटो, सेल्फी, छाया चित्रीकरण करु नये. नदी किनाऱ्या लगतच्या गावातोल नागरिक, पशुधन तसेच पालकांनी विशेषतः लहान मुलांची उचित काळजी घ्यावी, असे ही प्रशासनातर्फे सुचित करण्यात आले आहे. या पावसामुळे जिल्ह्यात शेतीपिकांचे नुकसान झाल्याची शक्यता नाकारता येत नाही. शासन आदेश क्रमांक सीएलएस-२०२३/प्र.क्र.२६०/म-३ दिनांक २२.०७.२०२४ नुसार जिल्ह्यामध्ये ज्या महसुली मंडळात अतिवृष्टी झाली आहे किंवा यापुढे होईल, त्या जिल्ह्यातील शेतीपिकांचे पंचनामे विहित कार्यपद्धतीनुसार तातडीने करण्याबाबत सूचना प्राप्त झाल्या आहेत.

त्यानुसार बीड जिल्हाधिकारी कार्यालयाच्या दिनांक २९.०७.२०२४ नुसार जिल्हयात अतिवृष्टीने शेतीपिकांचे नुकसान झाल्याचे निदर्शनास आल्यास शेतीपिकांचे पंचनामे करण्याबाबत जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, उपविभागीय अधिकारी सर्व, तहसिलदार सर्व यांना कळविले असल्याचे प्रसिद्धी पत्रकात लिहीले आहे.

## किनवट येथे मराठा सेवा संघाचा ३४ वा वर्धापन दिन थाटात साजरा मराठा समाजातील प्राध्यापक डॉक्टर वकील पत्रकार शिक्षक अधिकारी कर्मचारी बांधवांचा झाला सन्मान

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट नांदेड-किनवट : किनवट गोकुंदा येथे मराठा सेवा संघाच्या ३४ व्या वर्धापन दिनानिमित्त समाजातील प्राध्यापक डॉक्टर वकील पत्रकार शिक्षक अधिकारी कर्मचारी बांधवांचा यावेळी सन्मान चिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा.मारोतराव गव्हाणे प्रमुख पाहुणे म्हणून मराठी पत्रकार परिषदेचे जिल्हा उपाध्यक्ष फुलाजी गरड पाटील मराठा सेवा संघाचे माजी तालुकाध्यक्ष उमाकांत इंगोले प्रा.द्वारकाप्रसाद वायाळ मा.भदाणे हे उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात जिजाऊ वंदनेने करण्यात आली.प्रारंभी राजमाता माँ. साहेब जिजाऊ छत्रपती शिवाजी महाराज डॉ.बाबासाहेब आंबेडकर महात्मा फुले संत सेवालाल महाराज यांच्या प्रतिमेचे पुष्पहार घालून उपस्थित मान्यवरांनी अभिवादन केले. प्राध्यापक उमाकांत इंगोले यांनी मराठा सेवा संघ शिवधर्म याविषयी सखोल मार्गदर्शन केले. आ.ह.साळुंखे मा.म.देशमुख यांच्या विचारांची समाजाला अत्यंत गरज असून त्यांचे चरित्र हे समाजाच्या शैक्षणिक व सामाजिक उन्नतीचे असल्याचेही यावेळी इंगोले यांनी आपले विचार व्यक्त केले. तर पत्रकार फुलाजी गरड पाटील यांनी मराठा सेवा संघाच्या सद्यपरिस्थितीत सेवा संघाचे काम उत्कृष्ट पद्धतीने चालू असून समाजामध्ये एक चांगला मेसेज जात असल्याचेही यावेळी त्यांनी सांगितले तर प्राध्यापक द्वारकाप्रसाद वायाळ यांनी मराठा सेवा संघ व स्पर्धात्मक परीक्षा बद्दल सखोल मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा.मारोतराव गव्हाणे यांनी मराठा आरक्षणा विषयी मनोज जरांगे पाटील हे करीत असलेलं प्रयत्न हे मराठा समाजाने एकीच्या भावनेतून मराठा आरक्षणा विषयी लढा दिला पाहिजे अशी भावना व्यक्त करत मराठा सेवा संघाने १९९० पासून मराठा समाजात विचारांची क्रांति घडवत समाजातील अनिष्ट रूढी परंपरा याला फाटा देत मराठा समाजाला एका वेगळ्या विचारांच्या समूहात जोडून समाजात जागृती निर्माण केल्याचेही गव्हाणे यांनी आपल्या अध्यक्ष समारोप प्रसंगी सांगितले. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकेतून मराठा



सेवा संघाचे प्रवक्ते प्रा.शिवदास बोकडे यांनी मराठा सेवा संघाचा ३४ वर्षाचा कार्यकाळ मराठा सेवा संघ काल आज आणि उद्या याविषयी सखोल मार्गदर्शन करत मराठा सेवा संघ संभाजी ब्रिगेड जिजाऊ ब्रिगेड व सर्वच कक्षा विषयी आपले सखोल मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन व उपस्थित सर्वांचे आभार मराठा सेवा संघाचे तालुकाध्यक्ष प्रा.दगडू भरकड यांनी मानले. यावेळी मराठा सेवा संघाचे बाळकृष्ण कदम, ज्ञानेश्वर कदम ,श्याम फाळके,आशिष कऱ्हाळे संदीप कोल्हे,संभाजी ब्रिगेडचे जिल्हा प्रसिद्धी प्रमुख बालाजी पाटील सिरसाट तालुकाध्यक्ष सचिन पाटील कदम, आकाश इंगोले प्रा.अनिल पाटील प्रा.सोमवंशी प्रा.जावळे संजय पवार,गजानन माने डॉ.सतीश सोरटे,डॉ. डॉ.प्रतिक गावंडे सौ.योजना दिवसे, वैशाली लाखकर, उर्मिला कऱ्हाळे,माजी सैनिक पद्माकर मैंद पत्रकार बापूसाहेब तुपेकर,सुधाकर कदम, माधव सूर्यवंशी बबन वानखेडे किरण ठाकरे शिवाजी काळे जगदीश गरड,राजेंद्र ठाकरे दिगंबर चव्हाण मारोतराव गरड,अनिल डहाके अँड.विजय कदम अँड. विलास सूर्यवंशी,गंगाधर सोळंके अमोल सिरसे, शिवाजी मोरे,अनिल बिराजदार, यांच्यासह मराठा सेवा संघ संभाजी ब्रिगेड पदाधिकारी कार्यकर्ते बांधव उपस्थित होते.

## डॉ.योगेश क्षीरसागरांनी बीड शहरातील नदीपात्रालगत भागाचा घेतला आढावा



बीड (प्रतिनिधी) दि.२ : शहरातील चांदणी चौक परिसरातील दगडी पुलासह नदीपात्राजवळील भागात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी सोमवारी (दि.२) सकाळी ११ वाजता भेट दिली. यावेळी स्थानिक नागरिकांशी संवाद साधत पुरसदृश्य परिस्थितीचा आढावा घेतला. गत ४८ तासापासून जिल्हाभरात संततधार पाऊस सुरू आहे. बिंदुसरा नदीपात्राजवळील भागाला पुराचा धोका निर्माण झालेला आहे. याबाबत नगरपरिषद प्रशासनाशी संवाद साधत आपत्कालीन व्यवस्थेची माहिती घेतली. तसेच, त्यांना नागरिकांच्या संपर्कात राहण्याच्या सूचना दिल्या. यावेळी ज्येष्ठ नेते सादेक जमा, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अल्पसंख्याक सेलचे जिल्हाध्यक्ष इक्बाल शेख, युवती जिल्हाध्यक्ष प्रिया डोईफोडे, सय्यद इलियास, बिभीषण लांडगे, सरपंच अमोल बागलाने, अशोक वाघमारे, विनोद हातागळे, माजेद कुरेशी, साजेद जागीरदार, ए.वन. मुजीब, अमर विद्यागर, शुभम कुलथे, राहुल शिंदे, ज्ञानेश्वर राऊत आदी उपस्थित होते. याप्रसंगी नगरपरिषदेचे कर्मचारी, पोलीस अधिकारी उपस्थित होते.

# आ. बाळासाहेब आजबे यांच्या वाढदिवसानिमित्त शेख जुनेद यांच्याकडून विद्यार्थ्यांना सायकल वाटप व लावण्याचा कार्यक्रम

पाटोदा प्रतिनिधी : आष्टी पाटोदा शिरूर तालुक्याचे आमदार बाळासाहेब आजबे यांच्या वाढदिवसानिमित्त पाटोद्यात दिनांक २९/८/२०२४ रोजी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे पाटोदा शहराध्यक्ष युवा नेता शेख जुनेद यांनी गरजवंत काही शालेय विद्यार्थ्यांना सायकल वाटप केले. तसेच आ. आजबे यांच्या वाढदिवसानिमित्त पाटोद्यात नगरपंचायत समोर लावण्यवती पुनम कुडाळकर यांच्या लावणीचा बहारदार कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला महिला भगिनी सह, पुरुष, युवक व लहान मुलांनी गर्दी केली होती. यावेळी वाढदिवसानिमित्त आ. बाळासाहेब आजबे यांचा फेटा बांधून शाल, हार घालून शेख जुनेद, रियाज सिद्दीकी, नारायण नागरगोजे, नगरसेवक बाबुराव जाधव, सय्यद साजेद, सुलेमान पठाण सह पदाधिकारी यांनी सत्कार केला. या वेळी डॉ. शिवाजी राऊत, काकासाहेब शिंदे, बप्पासाहेब जाधव, खाडे मेजर, शाम हुले सह राष्ट्रवादीचे पदाधिकारी उपस्थित होते. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पाटोदा शहराध्यक्ष जुनेद शेख यांनी अनावश्यक खर्च टाळत आ. बाळासाहेब आजबे यांच्या वाढदिवसा निमित्त शालेय विद्यार्थ्यांना मोफत सायकल वाटप करण्याचे ठरवले होते. या निमित्त गरजू शालेय विद्यार्थी, विद्यार्थिनींना आ. आजबे यांच्या हस्ते सायकल वाटप करण्यात आले. याप्रसंगी आ. आजबे यांनी स्वतः उपस्थित राहुन स्नेह सत्कार स्वीकारत जुनेद शेख यांनी राबविलेल्या



स्तुत्य उपक्रमाबद्दल त्यांच्यासह सर्व पदाधिका-यांचे अभिनंदन केले. पाटोदा तालुक्यातील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सर्व नेते मंडळी, पदाधिकारी आणि महिला भगिनी मोठ्या संख्येने या कार्यक्रमास उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन सय्यद साजेद यांनी केले तर कार्यक्रमाचे आयोजक युवा नेता शेख जुनेद यांनी आभार मानले.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
# लोकआरंभ






# संततधार पावसाने ओलांडली जिल्ह्याची सरासरी
## २०२३ मध्ये याच दिनांकास होता केवळ ४७ टक्के पाऊस

बीड दि. 2 :- या वर्षाच्या जून ते ऑगस्ट महिन्या दरम्यान पावसाळी सरासरीने जिल्ह्याची 655.5 इतकी सरासरी गाठली असून वार्षिक सरासरीच्या 115 टक्के पावसाची नोंद पहिल्या तीन महिन्यात झाली आहे गतवर्षी हाच पाऊस या दिनांकास केवळ 47.7 टक्के इतका होता.



यंदाच्या हंगामात पाऊस चांगला राहील असा अंदाज हवामान खात्याने वर्तविला होता त्यानुसार जिल्ह्यात सर्वच तालुक्यांमध्ये सरासरी ओलांडली गेली आहे व मुबलक प्रमाणात पावसाची नोंद सर्व ठिकाणी झाली आहे. जिल्ह्यात जून ते सप्टेंबर ची वार्षिक सरासरी 566.1 मिमी. इतकी असताना यंदा 1जून 2024 पासून आतापर्यंत 655. 5 मिलिमीटर सरासरी पावसाची नोंद झाली आहे.

तालुका निहाय झालेल्या पावसाची टक्केवारी खालील प्रमाणे आहे बीड जिल्हा एकूण सरासरी 566.1 मिलिमीटर प्रत्यक्ष झालेला पाऊस 655.5 मिलिमीटर. बीड तालुक्यात जून ते सप्टेंबर सरासरी 594.5 प्रत्यक्षात झालेला पाऊस 664.2 मिलिमीटर टक्केवारी 111.9, पाटोदा तालुक्यात 538.7 प्रत्यक्षात झालेला पाऊस 747.9 टक्केवारी 138.8,आष्टी तालुक्यात 546.1 प्रत्यक्षात झालेला पाऊस 601.7 टक्केवारी 110.2,आष्टी तालुक्यात 546.1 प्रत्यक्षात झालेला पाऊस 601.7 टक्केवारी 1102,गेवराई तालुक्यात 587 प्रत्यक्षात झालेला पाऊस 660.8 टक्केवारी 112.6,माजलगाव तालुक्यात 616.9 प्रत्यक्ष झालेला पाऊस 6080 टक्केवारी 110.2,अंबाजोगाई तालुक्यात 632.4 प्रत्यक्षात झालेला पाऊस 698 टक्केवारी 110.4,केज तालुक्यात 583.6 प्रत्यक्षात झालेला पाऊस 612 टक्केवारी 104.9,परळी वैजनाथ तालुक्यात 628.1 प्रत्यक्षात झालेला पाऊस 657.9 टक्केवारी 104.7,धारूर तालुक्यात 669.8 प्रत्यक्षात झालेला पाऊस 685.4 टक्केवारी 102.3,वडवणी तालुक्यात 60.7 प्रत्यक्षात झालेला पाऊस 627.3 टक्केवारी 104.4,शिरुर का.तालुक्यात 515.6 प्रत्यक्षात झालेला पाऊस 632.6 टक्केवारी 122.7 आज सकाळी प्राप्त नोंदीनुसार गेल्या 24 तासात बीड जिल्ह्यामध्ये एकूण 61 महसूल मंडळामध्ये अतिवृष्टीची नोंद झालेली आहे.

100 मिलिमीटर च्या वर एकूण 35 महसूल मंडळामध्ये अतिवृष्टीची नोंद झालेली आहे. सर्वात जास्त अतिवृष्टीची नोंद झालेले महसूल मंडळ,गेवराई तालुक्यातील रेवकी महसूल मंडळ 171.5mm,माजलगाव तालुक्यातील,गंगामसला महसूल मंडळ 171.0mm,परळी तालुक्यातील,सिरसाळा महसूल मंडळ 155.3 mm,धारुर तालुक्यातील,अंजनडोह महसूल मंडळ 108.8 mm,पैठण येथील जायकवाडी धरण 87 टक्क्याहून अधिक भरल्यानंतर यातून ताशी 500 दिवसात निसर्ग माजलगाव धरणासाठी सुरू करण्यात आलेला आहे. सदर पाणी जिल्ह्यात दाखल झाल्याचे शहागड येथील पुलावरून स्पष्ट निर्दशनास येत आहे.

बीड जिल्ह्यातील बिंदुसरा प्रकल्प देखील पूर्ण क्षमतेने भरला असून बीड शहरालगत बिंदुसरा नदी मधून दुथडी पाणी वाहताना दिसत आहे. पाण्याची आवक सुरू असल्याने नदीकाठच्या नागरिकांनी सतर्कता बाळगावी अशा सूचना जिल्हा प्रशासनाच्या वतीने करण्यात आल्या आहेत.अनेक ठिकाणी झालेल्या अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर पाऊस थांबताच शेतीचे पंचनामे करण्याचे निर्देश जिल्ह्याचे पालकमंत्री तथा राज्याचे कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी रविवारी जारी केले आहेत.

*******

## माऊली माऊली गुरुराज माऊली च्या जयघोषात भव्य शोभायात्रा..प.पु.ष.ब्र.108 तपोरत्न श्री. शिवानंद शिवाचार्य महास्वामीजी तमलूरकर यांचे 40 वे अनुष्ठानाची सांगत



बीड /प्रतिनिधीबीड तालुक्यातील श्रीक्षेत्र कपिलधार येथे प.पु.ष.ब्र.108 तपोरत्न श्री. शिवानंद शिवाचार्य महास्वामीजी तमलूरकर ता.देगलुर जि.नांदेड यांचे श्रीक्षेत्र कपिलधार येथे 40 वे अनुष्ठान सुरू होते .या अनुष्ठानात शिवपाठ , सामुहिक ईष्टलिंगपुजा, गाता भजन व गुरूवर्यांचे अमृत उपदेश व शिवमहिमा महाराज सांगत आहेत. दिनांक 31/8/2024 शनिवारी रोजी भव्य अश्व शोभा यात्रेने व स्वामी महाराजांच्या जयघोषने या अनुष्ठानाची सांगता झाली. हि भव्य मिरवणूक मन्मथ स्वामी च्या समाधी स्थाना शिवानंद शिवाचार्य महाराजांनी जमलेल्या सर्व भाविक भक्तांना व जमलेल्या जनसमुदायांना उपदेश पर आशीर्वाद दिला व या महिन्याचे व अनुष्ठानचे महिमा सांगितली. श्रीक्षेत्र कपिलधार येथे चालू असलेल्या श्रावण मास अनुष्ठान, रुद्र पूजा ,व गुरु माऊलींचे अमृत उपदेश ऐकण्यासाठी आंध्रप्रदेश,कर्नाटक , तेलंगणा आदी विविध राज्यातून तसेच पंचक्रोशीतील असंख्य भावीक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. शेवटी जमलेल्या सर्व भाविक भक्तांना महाप्रसादाचा व भोजनाचा आनंद घेतला.

## नुकसानग्रस्त पीक विमाधारक शेतक-यानी वेळीच तक्रारी करण्याचे :जिल्हा कृषी विभागाचे आवाहन

बीड, दि.2 :- सध्या जिल्हयात सततचा पाऊस सुरु असल्यामुळे नुकसानग्रस्त पीक विमाधारक शेतकऱ्यांनी वेळीच तक्रारी कराव्यात, असे आवाहन करण्यात आलेले आहे. 'प्रधानमंत्री फसल बीमा योजना खरीप हंगाम २०२४' मध्ये 'भारतीय कृषी विमा कंपनी मार्यादित' यांच्यामार्फत बीड जिल्ह्यामध्ये राबविण्यात येत आहे.या अंतर्गत ज्या शेतकऱ्यांनी या काळांमध्ये पिकांचे स्थानिक नैसर्गिक आपत्ती या बाबी अंतर्गत विमा संरक्षित क्षेत्र जलमय झाल्यास,भूस्खलन,गारपीट, ढगफुटी, महापूर, दीर्घ काळ पाणी साचून झालेले नुकसान व चक्रीवादळ, वीज पडून लागलेली नैसर्गिक आग इत्यादी कारणामुळे पिकाचे नुकसान झाले असल्यास. यासह ज्या पिकांची काढणीनंतर शेतात पसरवून अथवा पेंड्या बांधून सुकवणी करणे आवश्यक असते अश्या कापणी/काढणी नंतर सुकवणीसाठी शेतात पसरवून ठेवलेल्या अधिसूचित पिकांचे काढणीनंतर दोन आठवड्यांच्या आत(१४ दिवस) गारपीट,चक्रीवादळ, चक्रीवादळामुळे आलेला पाऊस आणि बिगर मोसमी पावसामुळे नुकसान झाले असल्यास खरीप हंगाम २०२४ मध्ये पिक विमा भरलेल्या शेतकरी बांधवांनी ७२ तासात पिक विमा कंपनीकडे ऑनलाइन तक्रार करावी. नुकसानग्रस्त पीक विमाधारक शेतकरी बांधवांनी वेळीच तक्रारी दाखल कराव्यात. पिक विमा कंपनीला तक्रार देण्यासाठी कृषी व शेतकरी कल्याण विभागामार्फत विकसित क्रॉप इन्शुरन्स अप्लिकेशन पुढील लिंक द्वारे गूगल प्ले स्टोर वरून डाऊनलोडकरून घ्यावे.

https://play.google.com/store/apps/details?id=in.farmguide.farmerapp.central या अप्लिकेशनचा वापर करून त्याद्वारे माहिती द्यावी. अधिक माहितीसाठी तालुका व जिल्हा कृषी कार्यालयातील खालील विमा प्रतिनिधी यांच्याशी संपर्क साधावा. असे आवाहन बीड जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी, श्री सुभाष साळवे यांनी केले आहे. तसेच जर काही अडचण आल्यास कंपनीचा टोल फ्री क्रमांक १४४४७ असा असा ई-मेल पुढील प्रमाणे आहे. pikvima@aicofindia.com यावरही संपर्क करू शकता, असे ही सांगितले आहे.

तालुका प्रतिनिधी यांचे संपर्क क्रमांक खालीलप्रमाणे बीड तालुक्यात अविनाश सोनावणे (७०२०६२१७४७ ),पाटोदा तालुक्यात गोल्हार संपत (९७६४५५२२०३), आष्टी तालुक्यात लोंढे विनोद (९१४६८४०१०१), शिरूर कासार तालुक्यात विघ्ने गणेश (९७६७३५५९६९), माजलगाव तालुक्यात कुशेर आनंद (८३२९१३५७८९),गेवराई तालुक्यात चिकणे धनंजय (८४८२९१४४४४ ), धारूर तालुक्यात विशाल गायकवाड (७७०९८२६९२६ ), वडवणी तालुक्यात सावंत लहू (७३५०५०६३५५), अंबेजोगाई तालुक्यात पोटभरे नंदकुमार, (९४०३१८१४१४), केज तालुक्यात चौरे राहूल (८००७३३००२१), परळी तालुक्यात डापकर भागवत (९४०४८८६८८३ ), जिल्हा व्यवस्थापक इनकर बाबासाहेब (९८५०३१००५३ ) यांच्याशी संपर्क करण्याचे आवाहन जिल्हा कृषी विभागाने केले आहे.

## कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी साजरा केला जन्म गावी बैलपोळा सण

परळी वैद्यनाथ (दि.02) - महाराष्ट्र राज्याचे कृषिमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी आपले जन्मगाव नाथरा ता. परळी वै. येथे आज बैलपोळ्या निमित्त उपस्थित राहून आपल्या शेतातील बैल जोड्यांचे कुटुंबीयांसमवेत पारंपरिक पद्धतीने पूजन केले व बळीराजाचा जोडीदार असलेल्या बैल जोड्यांना पुरणपोळीचा नैवेद्य भरवला. बैलपोळ्याच्या निमित्ताने मराठवाड्यात बैलांची पूजा करताना पाऊस आल्याची चाहूल लागल्याचे एक खास गीत म्हटले जाते, "चाहुर चाहुर चांग भलं, पाऊस आला घरला चला" अशा आशयाचे हे ग्रामीण गीत बैलजोड्यांचे पूजन करताना स्वतः धनंजय मुंडे सुद्धा हे म्हणताना पाहायला मिळाले! देशाच्या समृद्ध कृषी परंपरेमध्ये बळीराजाच्या सोबतीने किंबहुना बळीराजाच्या बरोबरीने कष्ट उपसणाऱ्या बैलांच्या प्रति कृतज्ञता व्यक्त करण्याचा बैलपोळा हा सण असून या निमित्ताने राज्यातील समस्त शेतकरी बांधवांना आपण शुभेच्छा देतो, असे धनंजय मुंडे यांनी म्हटले आहे. या प्रसंगी धनंजय मुंडे यांच्या मातोश्री रुक्मिणीबाई मुंडे, बंधू अजय मुंडे व अभय मुंडे यांसह आदी उपस्थित होते.

नुकसानीचा घेतला आढावा

दरम्यान ग्रामीण भागात बैलपोळ्याचा सण उत्साहात साजरा केला जात असताना आपली पारंपारिक प्रथा जपत कृषी मंत्री धनंजय मुंडे यांनी आजच कृषी विभागाच्या दोन बैठकांनाही ऑनलाईन मार्गदर्शन केले. याशिवाय मागील दोन-तीन दिवसापासून बीड जिल्ह्यासह राज्यात मराठवाड्यातील अनेक जिल्ह्यात अतिवृष्टीमुळे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे, त्या नुकसानीचाही ऑनलाइन बैठकीत अधिकाऱ्यांकडून आढावा घेतला, तसेच आवश्यक त्या ठिकाणी पावसाचा जोर कमी झाल्यानंतर पंचनामे करण्याचे आदेशही त्यांनी दिले आहेत. त्याचबरोबर मनुष्यहानी, पशुहानी होणार नाही, या पद्धतीने आपत्ती व्यवस्थापन करण्याच्या सूचनाही संबंधित यंत्रणाना दिल्या आहेत.



हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com